आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३०वाजता

२३ एप्रिल २०२४ - मंगळवार

ठळक बातम्या

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या प्रचाराचा उद्या अखेरचा दिवस/ सर्वच राजकीय पक्षांच्या प्रचाराला जोर

- केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची आज अकोल्यात प्रचारसभा

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या ११ मतदारसंघांमधे मिळून २५८ उमेदवार रिंगणात

- हनुमान जयंती निमित्त देशभरात उत्सवांचं आयोजन

- ग्राहकांची दिशाभूल करणारी औषधांची जाहिरात केल्या प्रकरणी पतंजली चा माफीनामा सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला

आणि

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना चेन्नई सुपरकिंग्ज आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात चेन्नईमधे रंगणार

**<><><><><>**

लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराचा उद्या अंतिम दिवस आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांचे प्रमुख नेते आपापल्या उमेदवारांसाठी प्रचारसभा, रोड शो आणि मतदारांची प्रत्यक्ष भेट घेऊन पक्षाची भूमिका मांडत आहेत. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी

सकाळी राजस्थानात टोंक – सवाई माधोपूर इथं प्रचारसभा घेतली. त्यानंतर ते छत्तीसगढमधे जांजगीर- चंपा इथं दुपारी आणि संध्याकाळी महासमुंद इथं प्रचारसभा घेणार आहेत.

केंद्रिय गृहमंत्री अमित शहा आज पश्चिम बंगालमधे रायगंज इथं प्रचारसभा घेणार आहेत. त्यानंतर ते महाराष्ट्रात अकोला इथं भाजपा उमेदवार अनुप धोत्रे यांच्या प्रचारसभेला संबोधित करतील. अनूप हे सध्या आजारी असलेले विद्यमान खासदार संजय धोत्रे यांचे चिरंजीव आहेत. या भागात काँग्रेसतर्फे डॉ अभय पाटील,वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख आणि माजी खासदार प्रकाश आंबेडकर यांच्यासह १७ उमेदवार इथं  निवडणूकीच्या रिंगणात आहेत. अमरावतीच्या भाजपा उमेदवार नवनीत राणा यांच्यासाठी अमित शहा उद्या अमरावतीत प्रचार सभा घेणार आहेत. आज संध्याकाळी बंगळुरु दक्षिण मतदारसंघात शहांची सभा होणार आहे. काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी आज कर्नाटकात प्रचार करणार आहेत. बसपा प्रमुख मायावती आणि समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव आज अलिगढमधे प्रचार करणार आहेत.

**<><><><><>**

आकाशवाणीवरुन राजकीय पक्षांच्या निवडणूक विशेष प्रसारणाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरुन दुपारी ३ वाजता प्रसारीत होणारं प्रादेशिक बातमीपत्र, आज दुपारी राजकीय पक्षाचं प्रसारण संपल्यानंतर प्रसारीत केलं जाईल.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातली उमेदवारी मागे घेण्याची मुदत काल संपली. तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या रायगड, बारामती, उस्मानाबाद,

लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या ११ मतदारसंघामध्ये ७ मे रोजी मतदान होणार आहे. यासाठी ३१७ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले होते. त्यातल्या काही उमेदवारांनी माघार घेतल्याने आता २५८ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत येत्या २५ एप्रिल रोजी संपणार आहे. २६ एप्रिल रोजी अर्जाची छाननी होणार असून उमेदवारांना २९ एप्रिल पर्यंत अर्ज मागे घेता येईल. चौथ्या टप्प्यात उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, बिहार, झारखंड, ओदिशा, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि जम्मू आणि काश्मीर सह, देशातली एकूण १० राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या लोकसभेच्या ९६ जागांसाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे.

महाराष्ट्रात औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांचा समावेश आहे.

अहमदनगर लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण सोलापूर, माढा लोकसभा मतदार संघाचा

आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात या वेळेत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

उच्च शिक्षणाबाबतच्या नुकत्याच जारी झालेल्या ‘क्यू एस’ जागतिक क्रमवारीमधली भारताची कामगिरी उत्साहवर्धक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भविष्यात दर्जेदार शिक्षणावर आणखी भर दिला जाणार असून, देशाच्या युवा शक्तीला त्याचा लाभ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. संशोधन, शिक्षण आणि नवोन्मेष या त्रिसूत्रीवर सरकारचा मोठा भर असल्याचं समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्ट मध्ये त्यांनी म्हटलं आहे.

भारतीय विद्यापीठांनी सर्व G20 देशांमध्ये सर्वोत्तम प्रगती नोंदवली असून, जगातल्या सर्वात वेगानं विकसित होणाऱ्या संशोधन केंद्रांमध्ये आपलं स्थान निश्चित केल्याचं क्यू. एस. चे मुख्य कार्यकारी अधिकारी क्वाक्वेरेली यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

हनुमान जयंतीनिमित्त आज देशभरात सूर्योदयाच्या वेळी हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. विविध ठिकाणच्या हनुमान मंदिर परिसरात रामायण आणि हनुमानाच्या जीवनावर आधारित देखावे उभारले. ते पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे. महाराष्ट्रात गावोवावी मोठ्या उत्साहात हनुमान जयंतीचा उत्सव साजरा होत आहे. मुंबईत जुहू चौपाटीवर वाळूशिल्पकार लक्ष्मी गौड यांनी हनुमानाची प्रतिकृती साकारली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. पवनपुत्र हनुमान यांचं समर्पण सर्व राम भक्तांसाठी प्रेरणादायी असल्याचं त्यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

ग्राहकांची दिशाभूल करणारी औषधांची जाहिरात प्रसिद्ध केल्या प्रकरणी पतंजलीनं दाखल केलेला माफीनामा सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळला. न्यायालयानं बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांना येत्या ३० एप्रिल रोजी व्यक्तिशः हजर होण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी सुनावणीची कक्षा केवळ एका संस्थेपर्यंत सीमित ठेवली जाणार नाही असं न्यायालयानं यावेळी स्पष्ट केलं. दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींच्या माध्यमातून उत्पादनांची विक्री करून लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या इतर कंपन्यांविरोधात केंद्रसरकारनं आतापर्यंत कोणती कारवाई केली, असा सवाल न्यायालयानं केला. त्याचप्रमाणे राष्ट्रीय वैद्यकीय आयोगानं, रुग्णांना हेतुपूर्वक महाग औषधं लिहून देणाऱ्या ऍलोपॅथी शाखेच्या डॉक्टरांची नोंदणी रद्द करण्याची तरतूद करावी अशी सूचना केली.

पतंजली संस्थेनं यापूर्वी २ आणि १० एप्रिल रोजी दाखल केलेला माफीनामा देखील सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला होता. आश्वासन देऊन त्यानंतर त्याचं उल्लंघन करणं हा न्यायालयाचा अवमान असून, कितीही वेळा दाखल केला, तरी माफीनामा अस्वीकारार्ह असल्याचं न्यायमूर्ती हिमा कोहली यांच्या अध्यक्षतेखालच्या पिठानं म्हटलं होतं.

**<><><><><>**

शासकीय नोकरीतल्या महिलांना अपंग मुलाची काळजी घेण्यासाठी बाल संगोपन रजा नाकारणं हे सरकारच्या घटनात्मक कर्तव्यांचं उल्लंघन असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. हिमाचल प्रदेश मधल्या एका प्राध्यापक महिलेनं आपल्या अपंग मुलाची काळजी घेण्यासाठी केलेला रजेचा अर्ज संबंधित संस्थेनं मंजूर केला नव्हता. या प्रकरणी या महिलेनं दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जे. बी. पर्डीवाला यांच्या खंडपीठासमोर झाली.

बाल संगोपन रजा हा एक महत्त्वाचा घटनात्मक अधिकार असूनही अनेक महिलांना तो नाकारला जातो आणि कामाची समान संधी दिली जात नाही. अपंग मुलांच्या मातांसाठी ही बाब गंभीर असल्याचं न्यायालयानं यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

प्रसिद्ध बांगलादेशी गायिका रिझवाना चौधरी बन्न्या यांना काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. वर्ष २०२४ च्या पद्म पुरस्कारांचं समारंभपूर्वक वितरण राष्ट्रपतींच्या हस्ते काल नवी दिल्ली इथं राष्ट्रपती भवनात झालं. रिझवाना चौधरी बन्न्या यांना कला क्षेत्रातल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<><><><><>**

नौदलाच्या महिला अधिकाऱ्यांचा सहभाग असणारं भारतीय नौदलाचं तारिणी हे जहाज दोन महिन्यांच्या यशस्वी सागरी सफरी नंतर गेल्या रविवारी २१ तारखेला मायदेशी परतलं. नौदल अधिकारी लेफ्टनंट कमांडर दिलना के. आणि लेफ्टनंट कमांडर रूपा ए. यांनी हा प्रवास केला असून गोवा ते मॉरिशसच्या पोर्ट ल्युईस बंदरापर्यंतची मोहीम यशस्वी करणारा हा पहिलाच भारतीय चमू ठरला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपरकिंग्ज आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना चेन्नईमधल्या एम.ए. चिदंबरम स्डेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं मुंबई इंडियन्सचा ९ गडी राखून पराभव केला.

//<><><><><>//